मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडमध्ये मिळकतकराच्या वर्गवारीत मोठा बदल

## यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात 50 कोटी रुपयांची वाढ होण्याचा प्रशासनाचा अंदाज आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा झालेला विकास लक्षात घेऊन मिळकतकर वसुलीतील सुसूत्रतेसाठी 'अ','ब' आणि 'क' अशा वर्गवाऱ्यांमध्ये बदल करून फक्त 'अ' आणि 'ब' अशा दोनच वर्गवाऱ्या ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात ५० कोटी रुपयांची वाढ होण्याचा प्रशासनाचा अंदाज आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात निवासी, औद्योगिक, मोकळ्या जमिनी अशा सात लाख ८४ हजार ४२० नोंदणीकृत मिळकती आहेत. महापालिकेचा उत्पन्नाचा प्रमुख स्रोत मिळकतकर आहे. विविध गावे मिळून पिंपरी-चिंचवड शहराची निर्मिती झाली आहे. नागरिकांना मुलभूत व पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी १९८२ मध्ये महापालिका अस्तित्वात आली. त्यानंतर साधारण तीन टप्प्यांत लगतच्या गावांचा समावेश झाला. शिवाय, झोपडपट्ट्या, चाळी, बैठी घरे, जुन्या इमारती, गृहनिर्माण सोसायट्या, समाविष्ट गावांचा विकास झाल्याने तिथे बांधकामे वाढली.

या मिळकतींकडून महापालिकेच्या वतीने करआकारणी केली जाते. त्याची 'अ', 'ब' आणि 'क' अशी वर्गवारी आहे. वर्गवारीनुसार करआकारणी केली जाते. सद्य:स्थितीत शहरातील 'ब' आणि 'क' या वर्गातील भागांमध्ये झपाट्याने विकास झाला असला, तरीही या भागातील मिळकतींना कमी दराने करआकारणी होते. म्हणून महापालिकेने वर्गवारीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव २० एप्रिल रोजी होणाऱ्या महापालिका सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे.



### सद्य:स्थितीतील विभागनिहाय गावे

» 'अ' विभाग : निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, सांगवी, पिंपरी वाघेरे, पिंपरीनगर, महापालिका भवन, फुगेवाडी, दापोडी, भोसरी या करसंकलन विभागीय कार्यालयातील सर्व समाविष्ट गट आणि १९९७ मध्ये समाविष्ट थेरगावचा भाग.
» 'ब' विभाग : थेरगाव कार्यालयांतर्गत भुजबळ वस्ती, वाकडकर वस्ती, भूमकर वस्ती, दिघी, बोपखेल कार्यालयांतर्गत साई पार्क, आदर्शनगर, दिघी गावठाण परिसर.
» 'क' विभाग : चऱ्होली, मोशी, चिखली, तळवडे, किवळे विभागातील सर्व भाग, थेरगाव अंतर्गत पुनावळे गावठाण, जीवननगर, निंबाळकरनगर, ताथवडे गावठाण; फुगेवाडी, दापोडी कार्यालयांतर्गत बोपखेल आणि शहरातील सर्व झोपडपट्ट्या

### असा असणार कर

» शहरातील मिळकतींची केवळ 'अ' आणि 'ब' अशी वर्गवारी करण्यात येणार आहे. निवासी मालमत्तांना 'अ' वर्गात ३२२ रुपये, 'ब' वर्गात ३०६ रुपये प्रतिचौरस मीटर असा कर असेल. बिगरनिवासी मिळकतींना 'अ' वर्गात ९६७ रुपये, तर 'ब' वर्गात ९१९ रुपये प्रतिचौरस मीटरप्रमाणे कराची आकारणी केली जाणार आहे. या विषयाला सर्वसाधारण सभेची मान्यता मिळाल्यानंतर एक एप्रिल २०२६ नंतर नोंदणी झालेल्या आणि यापुढे नोंदणी होणाऱ्या नवीन मिळकतींसाठी हे दर लागू केले जाणार आहेत.

### प्रस्तावित विभागनिहाय गावे

» 'अ' विभाग : निगडी प्राधिकरण, आकुर्डी, चिंचवड, थेरगाव, सांगवी, पिंपरी वाघेरे, पिंपरीनगर, महापालिका भवन, फुगेवाडी दापोडी, भोसरी, चऱ्होली, मोशी, चिखली, वाकड कस्पटेवस्ती आणि किवळे कार्यालयांतर्गत रावेत.
» 'ब' विभाग : तळवडे व दिघी बोपखेल कार्यालयांतर्गत समाविष्ट सर्व भाग, किवळे कार्यालयांतर्गत किवळे, मामुर्डी, विकासनगर आणि शहरातील सर्व झोपडपट्ट्या.

# अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे कार्यमुक्त; कुलदीप जंगम यांच्या रुजू होण्याचा मार्ग मोकळा

## तीन वर्षांचा कार्यकाळ संपताच निर्णय; आयएएस अधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठी बदल

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकाचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना गुरुवारी तडकाफडकी महापालिका सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यासंदर्भातील आदेश दिले. या निर्णयामुळे अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्त झालेले सनदी अधिकारी (आयएएस) कुलदीप जंगम यांच्या रुजू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका 'ब' वर्गात असून नवीन आकृतीबंधानुसार तीन अतिरिक्त आयुक्तांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यापैकी दोन पदे प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांसाठी, तर एक पद पदोन्नतीसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. सध्या विजय खोराटे, तृप्ती सांडभोर आणि विक्रांत बगाडे हे तीन अतिरिक्त आयुक्त कार्यरत होते.

दरम्यान, राज्य शासनाने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी



कुलदीप जंगम यांची अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती केली. मात्र, त्यांच्या नियुक्तीचा नेमका पदभार कोणाकडून घेतला जाणार, याबाबत स्पष्टता नसल्याने प्रशासनात संभ्रम निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होत आलेले विजय खोराटे यांना कार्यमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. खोराटे यांची ७ जुलै २०२३ रोजी अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती झाली होती. तसेच, त्यांच्या अखत्यारीतील अग्निशमन व पर्यावरण विभागाचा कार्यभार यापूर्वीच काढण्यात आला होता.

राज्य शासनाने अतिरिक्त आयुक्तपैकी एक पद भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यासाठी राखीव ठेवल्याने त्यानुसार कुलदीप जंगम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खोराटे यांना नगरविकास विभागात रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात आल्याने जंगम यांच्या पदग्रहणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा सायकल शेअरिंग; स्थायी समितीकडून विकासकामांना मंजुरी

## पिंपळे सौदागरमध्ये प्रायोगिक सुरुवात; कोट्यवधींच्या प्रकल्पांना हिरवा कंदील

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात बंद करण्यात आलेला पब्लिक बायसिकल शेअरींग उपक्रम पुन्हा सुरू करण्यात येत आहे. त्यासाठी पिंपळे सौदागर येथे दोन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सुरुवात करण्यात आली आहे. यासह विविध विकासकामांच्या खर्चांना स्थायी समितीने बुधवार (दि. 15) झालेल्या सभेत मंजुरी दिली. सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. यावेळी समितीचे सदस्य, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसचिव मुकेश कोळप व अधिकारी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडच्या वतीने मोठा गाजावाजा करीत शहरात पब्लिक बायसिकल शेअरींग उपक्रम सुरू करण्यात आला होता.

मात्र, नागरिकांच्या प्रतिसादाअभावी तसेच, सायकलची चोरी व मोडतोड झाल्याने तो उपक्रम गुंडाळण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली होती. तोच उपक्रम आता भोसरी येथील प्रीवाई टेक्नॉलॉजीस प्रा. लि. कंपनीच्या सहकार्याने महापालिका शहरभरात राबत आहे. त्यातील 10 टक्के उत्पन्न महापालिकेस मिळणार आहे. सायकल भाडे तसेच, स्टॅण्डवर जाहिरात प्रदर्शन करून ती कंपनी उत्पन्न मिळवणार आहे. पहिल्या टप्प्यात पिंपळे सौदागर येथे दोन ठिकाणी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सकाळी व संध्याकाळी प्रत्येकी 2 तास सायकल भाड्याने दिल्या जाणार आहेत. सामान्य सायकलसाठी प्रति मिनिट 25 पैसे तर, मासिक पास 350 रुपये आहे. इलेक्ट्रिक सायकलसाठी प्रति मिनिट 50 पैसे तर, मासिक भाडे 550 रुपये आहे. सायकलसाठी एका दिवसाचा पास 60 रुपये आणि इलेक्ट्रिक सायकलचे भाडे 100 रुपये आहे. हा उपक्रम यशस्वी झाल्यास तो संपूर्ण शहरात राबवला जाणार आहे, असे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले.



### सुनावणीच्या टप्प्यात डीपीची पुस्तिका मराठी भाषेत छापणार

**» महापालिकेने सुधारित विकास योजना आराखडा (डीपी प्लान) ची पुस्तिका इंग्राजी भाषेत छापली होती. शहरातील अनेक नागरिकांना डीपीची संपूर्ण माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे अनेक नागरिकांना आरक्षणाबाबत हरकत किंवा सूचना नोंदवता आली नाही. या संदर्भात अनिश काळभोर, खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, महेश लांडगे, अमित गोरखे यांनी नगर रचना विभागाकडे तक्रार केली होती. याबाबत दै. पुढारीनेही ठळक वृत्त प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेत सुधारित डीपी प्लानची 460 पानांच्या पुस्तिकेचे मराठीत भाषांतर करण्यात येणार आहे. त्यासाठी 4 लाख रुपये शुल्क आहे. ते शुल्क विभागीय सहायक भाषा संचालक कार्यालयास देण्यात येणार आहे. या पुढे डीपीची पुस्तिका इंग्राजीसह मराठी भाषेत तयार केली जाणार आहे, असे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले. दरम्यान, हरकती स्वीकारुन सुनावणीची प्रक्रिया येऊन ठेपली असताना, पुस्तिकेचे मराठी भाषांतर करण्यात येत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**

### कल्पतरू चौकात भुयारी मार्ग

**» पिंपळे गुरव येथील वाकड ते नाशिक फाटा रस्त्यावर कल्पतरू चौकात (म्हसोबा चौक) भुयारी मार्ग तयार करण्यात येणार आहे. त्या कामासाठी सहा सल्लागारांनी सहभाग घेतला. त्यातील इंफाकिंग कन्सल्टिंग इंजिनियर्सची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या एजन्सीला एकूण कामाच्या 1.90 टक्के शुल्क दिले जाणार आहे. वाहतूक व नागरी नियोजनाच्या दृष्टीने पिंपळे सौदागर येथील पीके चौक सिग्नल फी करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणूक करण्यात आली आहे.**

शहरातील झोपडपट्टी व दाटवस्ती भागांमध्ये गटर करणे. स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे. शहरातील रस्ते व वाहतूक सुधारण्यासाठी निगडी-दापोडी रस्त्यावरील बसस्थानक व डेडिकेटेड लेन दुरुस्तीसाठी 31 लाख 46 हजार रुपये खर्च करणे. सांगवी-किवळे बीआरटी रस्त्याचे डांबरीकरण करणे. निगडी टिळक चौक ते दुर्गानगर रस्त्यावरील कामे करणे. प्रभाग क्रमांक 24 मधील सदाशिव कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी, आनंद पार्क परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.आकुर्डी रुग्णालय व नवीन भोसरी रुग्णालयातील क्ष-किरण विभागासाठी बॅटरी खरेदी करणे. नवीन थेरगाव गावठाण येथे 340 खाटांच्या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयासाठी फर्निचर खरेदी करणे. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात मानधन तत्त्वावर विविध पदांची भरती करणे. आरोग्य विभागासाठी 4 सक्शन युनिट वाहने व प्रत्येकी 2 मजूर उपलब्ध करून देण्यासाठी 3 कोटी 55 लाख 23 हजार खर्च करणे. महापालिका शाळांमध्ये प्राथमिक विभागासाठी 120 व माध्यमिक विभागासाठी 18 असे एकूण 138 एन्ट्री ऑपरेटर 24 महिन्यांसाठी नेमण्यासाठी 10 कोटी 14 लाख 47 हजार रुपये खर्च करणे. विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, प्रगतीपुस्तके व प्रवेश फॉर्म छपाई करण्यास 18 लाख रुपये खर्च करणे. पीएमपीएलच्या सन 2025-26 या आर्थिक वर्षातील नियमित संचलन तुटीसाठी 22 कोटी 26 लाखांचे अनुदान देणे, आदी खर्चा स्थायी समितीने मान्यता दिली.

# पिंपरी चिंचवड शहरातील 10 इंग्रजी माध्यम शाळा अनधिकृत

## अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश न घेण्याबाबत पालकांना शिक्षण विभागाकडून सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील १० खाजगी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा शासनाची आवश्यक परवानगी न घेता अनधिकृतरित्या चालविण्यात येत असल्याचे समोर आले आहे. संबंधित शाळांना यापूर्वीच शाळा बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आलेली असतानाही या शाळा नियमबाह्य पद्धतीने सुरू ठेवण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत सर्व पालकांना स्पष्टपणे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश अशा अनधिकृत शाळांमध्ये करू नये. अशा शाळांमध्ये प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर व भविष्यातील शैक्षणिक मान्यतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या बाबतीत योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असून, अनधिकृत शाळांमध्ये प्रवेश दिल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानीस संबंधित पालक स्वतः जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.




तसेच, संबंधित सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना या निवेदनाद्वारे स्पष्ट इशारा देण्यात येत आहे की, शासनाची आवश्यक परवानगी प्राप्त केल्याशिवाय शाळा सुरू करू नयेत. अन्यथा, अनधिकृतपणे शाळा सुरू ठेवून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान केल्यास महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयांनुसार संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी दिली आहे.

### अनधिकृत इंग्रजी माध्यमाच्या शाळा

**» ब्लोमिंग बर्ड्स, ताथवडे,लिटील स्टार इंग्लिश मिडीयम स्कूल, चिंचवडेनगर,माऊंट एव्हरेस्ट इंग्लिश स्कूल, कासारवाडी,डी. एम. के. इंटरनॅशनल स्कूल, कासारवाडी,माने इंग्लिश मिडीयम स्कूल, काळेवाडी,नर्चर इंटरनॅशनल स्कूल, काळजेवाडी, चऱ्होली,माईंडवर्ल्ड इंटरनॅशनल स्कूल, काळजेवाडी, चऱ्होली,हेम्स इंटरनॅशनल स्कूल, वाकड,कॅटलिस्ट इंटरनॅशनल स्कूल, चऱ्होली फाटा,गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल, मोशी**

# प्रभाग समिती अध्यक्ष निवडीचा बिगुल वाजला!

## महापालिकेच्या इमारतीतील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात होणार अध्यक्षपदाची निवड.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकाच्या प्रभाग समिती अध्यक्षांची निवडणूक येत्या २१ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या नवीन विस्तारीत इमारतीतील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात होणार आहे. या निवडणुकीसाठी १७ एप्रिल रोजी इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात येणार असल्याची माहिती नगरसचिव योगीता भोसले यांनी दिली.

महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालये व प्रभाग समित्या या 'मिनी महापालिका' म्हणून ओळखल्या जातात. शहरातील प्रशासकीय कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी या समित्यांना महत्त्व आहे. यंदा एकूण १५ प्रभाग समित्यांसाठी अध्यक्षांची निवड होणार असून, नव्या राजकीय समीकरणांनुसार १४ समित्यांवर भाजपचे अध्यक्ष तर एका समितीवर काँग्रेसला संधी मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, प्रभाग पुनर्रचनेतील त्रुटींचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्र पाठवून या रचनेला स्थगिती देण्याची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर नगरविकास विभागाने महापालिकेला तातडीने अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, त्यामुळे निवडणूक लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

मात्र, महापालिकेने आपला अहवाल शासनाकडे सादर केला असून अद्याप शासनाकडून कोणतेही नवीन निर्देश प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी नियोजित वेळापत्रकानुसार निवडणुका घेण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

मिनी महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभाग समिती अध्यक्षांची निवडणूक येत्या २१ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या नवीन विस्तारीत इमारतीमधील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात होणार आहेत. यासाठी येत्या १७ एप्रिल रोजी अर्ज मागविण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या नगरसचिव योगीता भोसले यांनी दिली.

यामुळे स्थगितीच्या चर्चांना काही प्रमाणात पूर्णविराम मिळाला असला, तरी पुनर्रचनेबाबतचा वाद कायम असून पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### स्थगितीच्या चर्चेनंतरही प्रक्रिया सुरू

» प्रभाग पुनर्रचनेत त्रुटी असल्याचा आरोप करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्थगितीची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर निवडणूक पुढे ढकलली जाण्याची शक्यता होती. मात्र महापालिकेने शासनाकडे अहवाल सादर केल्याने आणि अद्याप कोणतेही निर्देश न आल्याने निवडणूक प्रक्रिया सुरू ठेवण्यात आली आहे.

### २१ एप्रिलला निवडणूक निश्चित

» पुणे महानगरपालिकाच्या प्रभाग समिती अध्यक्षांची निवडणूक २१ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात ही प्रक्रिया पार पडणार असून १७ एप्रिल रोजी अर्ज मागविण्यात येणार आहेत. नगरसचिव योगीता भोसले यांनी याबाबत माहिती दिली.

### राजकीय समीकरणे स्पष्ट

» महापालिकेच्या एकूण १५ प्रभाग समित्यांपैकी १४ समित्यांवर भाजपचे अध्यक्ष तर एका समितीवर काँग्रेसला संधी मिळण्याची शक्यता आहे. या निवडणुकीमुळे शहरातील राजकीय समीकरणांवर परिणाम होणार असून, पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'सीबीएसई' निकालात पुणे विभाग देशात सातव्या स्थानी

## पुण्यात अनेक विद्यार्थ्यांना 90 टक्क्यांहून अधिक गुण, सीबीएसई दहावी निकालात पुणे विभागाचा 96.66% निकाल.

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) जाहीर केलेल्या दहावीच्या निकालात शहरातील शाळांनी दमदार कामगिरी केली. बहुतांश शाळांचा निकाल १०० टक्के लागला असून, अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत यश संपादन केले.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील सर्व ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेचा सरासरी निकाल ९०.५ टक्के लागला. अथर्व भिडे याने ९८ टक्क्यांसह प्रथम क्रमांक मिळवला. प्रशालेतील २५ विद्यार्थ्यांना ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले. २९ विद्यार्थ्यांनी संस्कृतमध्ये पैकीच्या पैकी गुण प्राप्त केले.

अक्षरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये ७५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले. रिधिमा भगवती हिने ९८ टक्के गुणांसह अव्वल येत विज्ञान, सामाजिक शास्त्र आणि हिंदी या विषयांत पूर्ण गुण मिळवले. एल्प्रो इंटरनॅशनल स्कूलमध्ये ५६.४ टक्के विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले. मूर्तजा रावत याने ९९.८ टक्के, निहार लोहाडे याने ९९.४, ऋषभ कोरलाहल्ली ९९.२ टक्के मिळवले.

ऑर्बिस स्कूल्सच्या मुंढवा आणि केशवनगर या दोन्ही संकुलांचा निकाल १०० टक्के लागला. केशवनगर शाळेतील शिवांश सिंग ९८.६० टक्के, तर मुंढव्याच्या शाळेतील जैविक मोटा याने ९८.२ टक्क्यांसह पहिला क्रमांक मिळवला. 'यंदाचा निकाल विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रम आणि चिकाटीचे प्रतीक आहे. संपूर्ण शैक्षणिक वर्षभर विद्यार्थ्यांनी मेहनत घेऊन यश मिळवले. शिक्षक आणि पालकांच्या सहकार्यामुळे यश मिळाले आहे,' असे मुंढवा येथील द ऑर्बिस स्कूलच्या प्राचार्य स्मिता पेंढारकर यांनी सांगितले.




### पुणे विभागाचा निकाल

» 'सीबीएसई'ने जाहीर केलेल्या निकालात महाराष्ट्राचा समावेश असलेल्या पुणे विभागाचा निकाल ९६.६६ टक्के लागला. देशात पुणे विभाग सातव्या स्थानी आहे. त्रिवेंद्रम विभागाचा निकाल सर्वाधिक ९९.७९ टक्के लागला. पुणे विभागातील १ हजार ४९६ शाळांतील एकण १ लाख ३३ हजार ६६३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यात ७५ हजार ९४० मुले, ५७ हजार ७२३ मुलींचा समावेश होता. त्यातील ७५ हजार ७७१ मुले, ५७ हजार ६६१ मुली अशा एकूण १ लाख ३३ हजार ३८२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यांपैकी ७२ हजार ८४८ मुले, ५६ हजार ८५ मुली असे एकूण १ लाख २८ हजार ९३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मुलांपेक्षा मुलींच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त आहे.

# उंड्री-मोहम्मदवाडीत पाण्याचा तीव्र तुटवडा

## 40 एमएलडी टाक्या 7 वर्षांपासून कोरड्या; पाइपलाइन रखडल्याने नागरिकांचा संताप, टँकर खर्चाने कंबरडे मोडले

**पुणे | प्रतिनिधी**

महंमदवाडी-उंड्री आणि कोंढवा परिसरातील सुमारे साडेआठ लाख नागरिकांना अद्यापही महापालिकेच्या पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. या भागांत आजही नागरिकांना महापालिकेकडून एक थेंबही पाणी मिळत नसल्याची गंभीर स्थिती आहे. विशेष म्हणजे कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या 40 एमएलडी (चार कोटी लीटर) क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या पूर्ण होऊनही गेल्या सात वर्षांपासून त्या कोरड्याच पडून आहेत.

या भागाचा महापालिकेत समावेश होऊन तब्बल 15 वर्षे उलटली असतानाही नियमित पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव नाराजी असून, त्यांनी वारंवार निवेदने देत आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. मात्र, प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार आहे. महापालिकेच्या म्हणण्यानुसार, दोन ठिकाणी प्रत्येकी सुमारे 300 मीटर पाइपलाइनचे काम शिल्लक आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर आठही पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी पोहोचू शकते. याशिवाय, कात्रज-कोंढवा रस्त्यावर 125 मीटर जागेचा प्रश्न अद्याप निकाली न लागल्याने अडथळा निर्माण झाला आहे. संबंधित ठिकाणी बांधकाम आणि जागेच्या ताब्याच्या अडचणींमुळे भूमिगत पाइपलाइन टाकण्यास अडथळे येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### आंदोलने, आश्वासने आणि 'जैसे थे' स्थिती

» काही दिवसांपूर्वी या प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी 'हंडा मोर्चा' काढण्यात आला होता. त्या वेळी नवल किशोर राम यांनी परिस्थिती सुधारण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतरही प्रत्यक्षात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही, अशी खंत स्थानिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, काही नागरिकांनी या विलंबामागे टँकर माफियांचा हस्तक्षेप असल्याचा गंभीर आरोप केला आहे. नियमित पाणीपुरवठा सुरू झाल्यास टँकर व्यवसायावर परिणाम होईल, या भीतीने पाइपलाइन कामात अप्रत्यक्ष अडथळे आणले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. काही सोसायट्यांवर खासगी टँकरचे पाणी घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचाही दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

पाण्याचा पुरवठा नसल्याने रिकाम्या टाक्यांचा गैरवापर होत असल्याचे समोर आले आहे. काही ठिकाणी तरुणांकडून सेल्फी, व्हिडिओ शूटिंग, तसेच अशोभनीय कृत्ये केल्याच्या घटना घडत आहेत. टाक्यांभोवती कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने धोका वाढला आहे.

या परिसरातील बहुतांश सोसायट्या खासगी टँकरवर अवलंबून आहेत. दररोज सुमारे 700 ते 800 टँकर पाणी आणले जाते. वाढत्या खर्चामुळे नागरिकांवर मोठा आर्थिक बोजा पडत असून, मागील अडीच वर्षांत पाणी खरेदीसाठी सुमारे तीन कोटी रुपयांहून अधिक खर्च झाल्याची माहिती समोर आली आहे.

### खासगी टँकरवर होतोय वारेमाप खर्च

» शहराच्या वाढत्या उपनगरांमध्ये मोठ्या प्रमाणावर बांधकामांना परवानगी देताना विकसकांनी पाणीपुरवठ्याची हमी दिली होती. मात्र, प्रत्यक्षात ती पूर्ण न झाल्याने रहिवाशांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. महंमदवाडी-उंड्री भागात टाक्या उभ्या असल्या, तरी त्या कोरड्या असल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढला आहे.

> पाण्याच्या टाक्यांचे काम पूर्ण झाले आहे. सध्या सुमारे 600 मीटर पाइपलाइनचे काम प्रलंबित असून, ते दोन टप्प्यांत पूर्ण केले जाणार आहे. या कामासाठी किमान दोन महिने लागण्याची शक्यता आहे. काही भागांत पाणीपुरवठा सुरू झाला असला, तरी उर्वरित नागरिकांना लवकरच दिलासा मिळेल.
>
> - नंदकुमार जगताप, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग.

# आरएमसी प्रकल्पावर महापालिकेचा बुलडोझर! 8 अनधिकृत प्रकल्प जमीनदोस्त..

## आरएमसी प्लांटवरील कारवाईमुळे बांधकाम क्षेत्रात खळबळ; 40 हजार मजुरांच्या रोजगाराचा प्रश्न

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने अखेर शहरातील अनधिकृत रेडी मिक्स कॉंक्रिट प्रकल्पावर कारवाई सुरू केली आहे. बुधवारी पहाटे लोहगाव-खांदवे नगर तसेच खराडी परिसरातील ८ आरएमसी प्लॅन्ट व अन्य बांधकामे जमीनदोस्त केली. या कारवाईत एकूण ५२ हजार २५० चौरस फूट अनधिकृत कच्चे- पक्के शेड आणि बांधकामे हटविण्यात आली. पहाटे दोन वाजता ही कारवाई करण्यात आली.

मात्र, या कारवाईवेळी स्थानिक नगरसेविकेचे पती आणि महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये जोरदार वाद झाला, त्यानंतर नगरसेविकेच्या पतीस पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तसेच कारवाईनंतर सोडून देण्यात आले. शहरात गेल्या महिन्यापासून आरएमसी प्रकल्पामुळे होणाऱ्या धुळीच्या प्रदूषणाच्या मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्या आहेत. खांदवे नगर येथील प्रकल्पाबाबत तक्रारी आल्याने महापालिकेने या प्रकल्पांना सील ठोकत ते बंद केले होते.



अतिक्रमण विभागाचे पथक मोठ्या पोलीस बंदोबस्तात दाखल झाले. त्यांनी कारवाई सुरू केली. यावेळी नगरसेविका डॉ. श्रेयस खांदवे यांचे पती प्रीतम खांदवे यांनी घटनास्थळी जाऊन कारवाई थांबविण्याचा प्रयत्न केला. तसेच, महापालिकेने कारवाईपूर्वी कोणतीही नोटीस दिलेली नाही. प्रकल्प आधीच बंद आहे, अशा सांगत कारवाई करण्यास विरो ध केला. कारवाईसाठी गेलेल्या महाराष्ट्र सुरक्षा दलाच्या सुरक्षा रक्षकांनी त्यांना ताब्यात घेऊन पिंजऱ्यामध्ये बसवले आणि पोलिस ठाण्यात घेऊन गेले. त्यानंतर महापालिकेने उरलेली कारवाई पूर्ण केली

### हजारो कामगार बेघर होणार

» आरएमसी हा बांधकामाचा मुख्य गाभा आहे, पायाभरणी, स्लॅब आदी बहुतांश बांधकाम त्यानेच होते. ते जर मिळाले नाही तर हे काम होणार नाही. हे काम करणारे जे विशेष मजूर असतात त्यांना बसून ठेवावे लागेल, ते काम पूर्ण झाले नाही तर पुढची प्लॅस्टरींग वगैरे कामे होणार नाहीत. ही एकमेकांवर अवलंबून असलेले कामे आहेत. त्यामुळे या सगळ्या कामगारांना हाताला काम न देता सांभाळणे अवघड जाणार आहे.

> "कारवाईवेळी प्रीतम खांदवे यांनी वाद घातला, त्यावरून काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. वादामुळे कारवाईत अडथळे निर्माण झाल्याने सुरक्षा रक्षकांनी त्यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात घेऊन गेले. महापालिकेने हा प्लॅन्ट पाडून टाकला आहे."
>
> - सोमनाथ बनकर, उपायुक्त, अतिक्रमण निर्मूलन विभाग